शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २०१ । बुधवार, दि. १६ जुलै २०२५ । पाने -८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## महाज्योतीचे अनुदान थकले

**मुंबई ।** सरकारकडे पैसेच नसल्याने महाज्योतीमधील संशोधक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे थकले असल्याची माहिती समोर आली आहे. या विद्यार्थ्यांना २०२१-२२ वर्षाच्या थकबाकीची रक्कम देणे प्रलंबित आहे. यासाठी १२६ कोटी रुपयांची आवश्यकता असून हा निधी मिळावा यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विकास विभागामार्फत मुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्यांकडे मागणी करण्यात आलेली आहे.

## रस्ते सिमेंट कॉँक्रीटचे होणार

**मुंबई ।** ग्रामीण भागात पंतप्रधान आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून रस्त्यांचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील रस्ते टिकाऊ होण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून होणारे रस्ते यापुढे सिमेंट कॉँक्रिटीचे करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

# शुभांशू शुक्लांचे पृथ्वीवर सुखरूप शुभागमन



**नवी दिल्ली ।** भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ४ अंतराळवीरांसह पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर उतरले आहे. शुभांशू हे सुमारे १८ दिवस अवकाशात होते, या काळात त्यांनी अनेक प्रयोगही केले. शुभांशू शुक्ला हे २५ जून रोजी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटर येथून फाल्कन ९ रॉकेटने अंतराळात गेले होते. आता ते सुखरूप पृथ्वीवर परतले आहेत.

शुभांशू शुक्ला हे अमेरिका, पोलंड, हंगेरीतील आपल्या ३ सहकारी अंतराळवीरांसह १४ जुलै रोजी दुपारी ४.४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीकडे निघाले होते. हे सर्व अंतराळवीर १५ जुलै रोजी पृथ्वीवर उतरले आहेत.

शुभांशू आणि त्यांच्या सहकाऱ्यांना बाहेर काढल्यानंतर त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी आणि अंतराळातील त्यांच्या शरीरावर झालेल्या परिणामांतून बरे होण्यासाठी १० दिवस देखरेखीखाली ठेवले जाणार आहेत. त्यानंतर ते भारतात परतण्याची शक्यता आहे. हा भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे.

### शुभांशू भारताचे दुसरे अंतराळवीर

शुभांशू शुक्ला हे १९८४ नंतर अंतराळात जाणारे भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. यापूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून अंतराळात प्रवास केला होता. शुभांशू यांच्या या मोहिमेनंतर भारत आगामी काळात अंतराळ स्थानक स्थापन करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे शुभांशू यांची ही मोहीम खास आहे.शुभांशू शुक्ला हे भारतीय हवाई दलात स्क्वाड्रन कमांडर आहे. त्यांना २००० तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव आहे. शुभांशू यांनी आपल्या १८ दिवसांच्या अंतराळातील कार्यकाळात ६० हून अधिक प्रयोगांमध्ये भाग घेतला आहे. ज्यात भारताच्या ७ प्रयोगांचा समावेश आहे. शुभांशू यांनी अंतराळात मेथी आणि मूगाचे बीजचा अभ्यास केला.

## संपादकीय

### खरेच कारवाई केली जाईल?

गेले काही दिवस कोसळत असलेल्या पावसाने राज्यातील अनेक शहरे पाण्यात बुडाली. शहरांमध्ये ठिकठिकाणी पाणी तुंबले. नाशिकही त्याला अपवाद नव्हते. तथापि नाशिककरांच्या तुलनेत नागपूरकर जरा नशीबवान निघाले. त्यांच्या गैरसोयींची नितीन गडकरींनी तातडीने दाखल घेतली. नालेसफाईचा देखावा केला का असा प्रश्न विचारून पाणी साचल्याबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. मागे लागलो तर निष्काळजीपणे कामे करणारे अधिकारी आणि कंत्राटदारांना सोडणार नाही असा सज्जड दमही दिला. गडकरींनी खरेच मनावर घ्यावे आणि रस्ते खड्ड्यात आणि शहरे पाण्यात घालणाऱ्यांना कडक शासन करावे अशीच जनतेची इच्छा असेल. कारण देशात व राज्यात सर्वदूर लोकांची हीच डोकेदुखी आहे. प्रश्न सगळ्याच कामांच्या दर्जाचा आहे. गुजरात वडोदरामधील पूल वाहतूक सुरु असतांना अचानक कोसळला. नागपूरमध्ये कामठी ते न्यू कामठीला जोडणाऱ्या उड्डाणपुलावरील रस्ता उद्घाटनाआधीच नुकताच खचला. अशा निकृष्ठ कामांची यादीच करायची म्हंटली तर ती मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच जाईल. मुद्दा आहे, त्याची जबाबदारी निश्चित करण्याचा. जी कोणत्याही शासकीय कामाची केली जात नाही असा जनतेचा अनुभव आहे. रस्ते खड्ड्यात जातात. ठिकठिकाणी पाणी तुंबते. नाल्यांचे सांडपाणी घरांमध्ये शिरते. आपत्ती व्यवस्थापनच आपत्तीत कोसळते. वीज वारंवार असहकार पुकारते. वाहतुकीचा बोजवारा उडतो. वाहतूकजाम नित्याची बाब बनते. सरकारी काम निकृष्ट दर्जाचे केले तरी त्याचा जाब कोणी विचारत नाही की त्याचा निधीही थांबवला जात नाही हे कंत्राटदार जाणून असतात. शहरी भागातील समस्या लक्षात तरी येतात किंवा त्यांची दखल घेण्याचे नाटक तरी केले जाते. पण ग्रामीण भागाचे काय? पण जनतेच्या समस्यांना कोणी वाली नाही अशी लोकांची अनुभवाअंती खात्री झाली आहे. इकडे पुण्यात अजित पवारांनी देखील रस्त्यांच्या कामात आडवे येणाऱ्यांना उचला आणि त्यांच्यावर गुन्हे दाखल करा असा त्यांच्या शैलीत दम दिला. फक्त ही कारवाई कधीपासून सुरु केली जाईल आणि कशी केली जाईल याबाबत लोकांच्या मनात संभ्रमावस्था पान २ वर

## घरातील सहा साक्षीदार फितूर, तरीही दोष सिद्ध...

# तिघा सख्ख्या भावांना जन्मठेप

### धुळ्यातील निखिल पाटील खून प्रकरण

**धुळे ।** शहरातील विद्युत नगर परिसरातील निखिल साहेबराव पाटील या २१ वर्षीय तरुणाच्या निर्घृण खूनप्रकरणी फिर्यादीसह सहा साक्षीदार न्यायालयात फितूर झाले, तरीही परिस्थितीजन्य व वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने मयूर, मनोज व मुकेश मच्छिंद्र शार्दूल या तिघा सख्ख्या भावांना जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी दहा हजार रुपये दंड ठोठावला. हा निकाल प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांनी आज दिला.

दि.४ फेब्रुवारी २०२२ रोजी, संशयाच्या किरकोळ कारणावरून मयूर शार्दूल याने निखिल पाटील याला आपल्या मावशीच्या घरी बोलावून घेतले. तेथे मयूरसह त्याचे सख्खे भाऊ मनोज व मुकेश यांनी निखिलच्या डोक्यात लाकडी दांडक्याने घाव घालून गंभीर जखमी केले. निखिलला उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल झाला. तपासाधि सपोनि दादासाहेब पाटील यांनी तात्काळ आरोपींना अटक करून



त्यांच्या अंगावरील रक्त लागलेले कपडे व लपवून ठेवलेला लाकडी दांडका जप्त केला. घटनेशी संबंधित १२ साक्षीदार न्यायालयासमोर उभे राहिले. मात्र त्यापैकी मयताचा भाऊ दीपक पाटील, आई वंदना पाटील, मित्र योगेश पाटील आदी सहा साक्षीदार फितूर झाले व न्यायालयात आरोपींना मदत करणारे जबाब दिले.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता संजय मुरक्या यांनी परिस्थितीजन्य पुरावे, पंचनामे, रासायनिक विश्लेषण अहवाल, व सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांचा आधार घेत ठोस युक्तीवाद केला. तपास अधिकारी, पंच साक्षीदार व इतर पुराव्यांवर विश्वास ठेवत न्यायालयाने तिघाही आरोपींना दोषी ठरवले.

तिघांनाही जन्मठेपेची शिक्षा, प्रत्येकी दहा हजार रुपयांचा दंड आणि दंड न भरल्यास एक महिन्याचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

या खटल्यात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता संजय मुरक्या यांना जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह तवर, चंद्रकांत पाटील, भारत भोईटे, शुभांगी जाधव यांचे सहकार्य लाभले. पैरवी अधिकारी म्हणून सहा. पोउनि. विजय जडे व पोकॉ. चव्हाण यांचेही योगदान राहिले.

## शशिकांत शिंदे राष्ट्रवादी श.प. गटाचे प्रदेशाध्यक्ष!

**मुंबई ।** जवळपास सात वर्षांपासून सुरुवातीला एकत्रित राष्ट्रवादी कॉँग्रेस आणि नंतर राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा वाहणारे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचा प्रदेशाध्यक्ष राजीनामा मंगळवारी अखेर मंजूर करण्यात आला. त्यानंतर विधान परिषद सदस्य आणि माजी मंत्री शशिकांत शिंदे यांची नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. मिळालेल्या संधीचे १०० टक्के सोनं करण्याचा मी प्रयत्न करेन, अशी ग्वाही शशिकांत शिंदे यांनी आपली निवड झाल्यानंतर दिली. तर एका माथाडी कामगाराचा मुलगा आपल्या पक्षाचे नेतृत्व करणार असल्याचा विशेष आनंद असल्याची प्रतिक्रिया शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. हा शेवट नाही तर एका नव्या पर्वाची सुरुवात आहे, अशी भावना मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष राजीनामा दिल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. मात्र राष्ट्रवादीच्या काही नेत्यांनी राजीनाम्याचे वृत्त फेटाळून लावले होते. स्वतः जयंत पाटील यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना आपण अजूनही प्रदेशाध्यक्ष पदावर असल्याचे स्पष्ट करताना भाजप प्रवेशाच्या बातम्या फेटाळल्या होत्या. मात्र राष्ट्रवादीच्या प्रदेश नेतृत्वात बदल होणार आणि शरद पवार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी भाकरी फिरवणार अशी चर्चा सुरूच होती आणि ती अखेर आज खरी ठरली.

## माजी आमदार फारुक शहा दादांच्या राष्ट्रवादीत

**धुळे ।** शहराच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक वळण आले, जेव्हा एमआयएमचे माजी आमदार आणि धुळे शहरातील लोकप्रिय मुस्लिम नेते फारुक शहा यांनी अधिकृतपणे राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा प्रवेश महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या सोहळ्याला युवक राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष सारांश भावसार यांचे विशेष संयोजन लाभले.



**सारांश भावसार यांच्या मध्यस्थीला यश**

धुळेच्या राजकारणात गेल्या काही वर्षांपासून फारुक शहा हे एक प्रखर मुस्लिम नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांनी एमआयएमच्या तिकिटावरून विधानसभा निवडणूक जिंकून धुळेकर जनतेचा विश्वास संपादन केला होता. मात्र पक्षाच्या कार्यशैलीतील कुंठित निर्णय, मुस्लिम समाजाच्या व्यापक हितासाठी आवाज न उचलणे आणि विकासापासून वंचित ठेवण्याची पक्षातील पान २ वर

## ठाकरे-देसाई यांच्यात खडाजंगी

**मुंबई ।** लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या उत्तरात मंत्री छापील उत्तर आणि अधिकाऱ्यांकडून जेवढी माहिती देण्यात आली आहे तेवढीच माहिती देत असल्याच्या शिवसेना ठाकरे गटाच्या टिकेवरून मंगळवारी विधानसभेत ठाकरे गटाचे आमदार आणि मंत्री शंभूराज देसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. आदित्य ठाकरे यांनी यावेळी संपतापाच्या भरात सरकारची लाज काढली. तर २०१९ ते २०२२ मध्ये सरकार असताना काय केले? असा सवाल करत आपण नाव घेतले नसताना यांच्या नाकाला मिरच्या लागण्याचे कारण नाही, असा आरोप देसाई यांनी केला. भास्कर जाधव यांनी मंत्र्याच्या वतीने उत्तर देण्यासाठी यांना लेखी परवानगी देण्यात आली आहे काय असे विचारले.

## सत्तेची हवा डोक्यात जाऊ देऊ नका!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आमदार,मंत्र्यांना सुनावले

**मुंबई ।** गेल्या काही दिवसांमध्ये शिवसेनेच्या काही नेत्यांचे वादग्रस्त व्हिडीओ समाज माध्यमांवर चांगलेच व्हायरल झाले आहेत. शिवसेनेचे नेते संजय गायकवाड यांनी जेवण खराब दिल्याचा आरोप करत आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमधल्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती, त्यांचा व्हिडीओ समोर आल्यानंतर विरोधकांनी टीकेची झोड उठवली, हे प्रकरण ताजे असतानाच शिवसेनेचे मंत्री संजय शिरसाट यांचा बॅगेसोबतचा एक व्हिडीओ समोर आला, त्या बॅगेमध्ये रोकड असल्याचा आरोप सुरू आहे. दरम्यान या सर्व घटनांनंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ॲक्शनमोडमध्ये आल्याचे पाहायला मिळत आहे. शिवसेनेच्या वादग्रस्त मंत्री आणि आमदारांना एकनाथ शिंदे यांनी चांगलंच सुनावले आहे.



गेल्या काही दिवसांत काही गोष्टी घडल्या, तुमच्याकडे दाखवले बोट माझ्याकडे असते. तुमचे आमदार काय करतात? असा प्रश्न मला विचारला जातो. तुम्ही सगळी माझी माणसे आहात. आपले कुटुंब एक आहे. तुमची बदनामी म्हणजे माझी बदनामी आहे .

चुकीच्या गोष्टींवर एनर्जी वाया घालवू नका. कमी बोला जास्त काम करा, बदनामीमुळे काही मंत्र्यांना घरी जावे लागले, असे म्हणत यावेळी एकनाथ शिंदे यांनी आपल्या आमदार आणि मंत्र्यांना अप्रत्यक्ष इशाराही दिला आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, आपल्या परिवारावर कारवाईचा बडगा उगारायला मला अजिबात आवडणार नाही. परंतु, मला कारवाई करावी लागणार नाही, तसेच काम तुमच्याकडून अपेक्षित आहे. मी रागावत नाही. मी प्रमुखासारखं वागत नाही. कार्यकर्त्यासारखं वागतो. तुम्हीही तसंच वागा. आपल्या डोक्यात हवा जाऊ देता कामा नये. कितीही पदं मिळाली तरी कार्यकर्ता आहे, असेच समजून कामं करा. कमी वेळात जास्त यश मिळालंय. लोकं आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे बदनामीचे डाव रचले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीची काळजी घ्या. यापुढील काळ कसोटीचा आहे. सामाजिक जीवनात पथ्य पाळावी लागतात. ती काळजी घ्या, असे एकनाथ शिंदे यांनी आपल्या नेत्यांना आणि आमदारांना म्हटले आहे. त्यामुळे सर्वच आमदार आता दक्ष झाले आहे.

# कामकाजात नापास; अनेक मंत्र्यांचे होणार पत्ते कट?

### कॅबिनेटमध्ये लवकरच फेरबदल : देवेंद्र फडणवीस धक्कातंत्र वापरण्याच्या तयारीत

**मुंबई ।** राज्याच्या कॅबिनेटमध्ये लवकरच मोठे फेरबदल होण्याचे संकेत आहेत. या संकेतानुसार अनेक बड्या मंत्र्यांना आपली खुर्ची गमवावी लागणार आहे. तर अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धक्का तंत्राचा वापर करण्याची शक्यता आहे. या धक्का तंत्राचा अनेक बड्या मंत्र्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. हे धक्का तंत्र फक्त भाजपच्या मंत्र्यांपुरतं मर्यादित असेल की एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसाठीही असेल याचीही चर्चा रंगली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणाकडे देशाचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्या अनुषंगाने



आता राज्याच्या कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. लवकरच महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिले जाईल, असे बोलले जात आहे. अनेक मंत्र्यांचे पत्ते कट केले जातील. खांदे पालट होईल, अनेक नव्या चेहऱ्यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच यामुळे अनेक मंत्र्यांना धक्का बसणार असल्याचे बोलले जात आहे.

**महायुतीत निर्माण झाला तणाव**

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या धक्का तंत्राची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. यापूर्वी केवळ भाजपच्याच मंत्र्यांना याचा फटका बसेल अशी शक्यता वर्तवली जात होती. पण आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉँग्रेसमधील काही मंत्र्यांनाही याची झळ बसू शकते, असे बोलले जात आहे. यामुळे महायुतीतील तिन्ही घटक पक्षांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

#### नवीन चेहऱ्यांना संधी देणार

या मंत्रिमंडळ फेरबदलात अनेक नव्या चेहऱ्यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. पक्षसंघटनेत चांगले काम केलेल्या किंवा आपापल्या भागांमध्ये मजबूत पकड असलेल्या नेत्यांना मंत्रिपदे दिली जाऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. त्यासोबतच, काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिले

## जीएसटी चुकवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई

**मुंबई ।** पिंपरी चिंचवड शहरात कागदपत्रांचा गैरवापर करून स्थापन केलेल्या बोगस कंपन्यांमार्फत सामान्य माणसाची फसवणूक करण्याबरोबरच जीएसटी चुकवणाऱ्या अशा कंपन्यांची राज्य सरकारच्या वस्तू आणि सेवा कर (स्टेट जीएसटी) विभाग तसेच गृह विभागामार्फत संयुक्तपणे तपासणी करून दोषी कंपन्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल अअशी माहिती अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी मंगळवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना जयस्वाल म्हणाले.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2500 |
| नवती (२) | : 2300 |

### मिश्कीली

